Vol 9 - 1935-36
July - June

289543

# नववें वर्ष–अनुक्रमणिका

—————:०:—————

## जुलै १९३५–जून १९३६

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |


१. लैंगिक नवमतवाद–१. १
२. अपघात की खून ? (लघुकथा) ८
३. पोंच व अभिप्राय, १४, ४६, ८१, ११०, १७९, २०४, २४१, २७२, ३०२, ३३८, ३७५,
४. पत्रव्यवहार, १५, ५३, ८४, ११२, १५१, १८३, २१४, २४७, २७६, ३०८, ३३९, ३६७,
५. शारदेचीं पत्रें, २२, ५५, ८८, १२०, १५६, १८७, २१७, २५१, २८१, ३१२, ३४४, ३७२,
६. मांसाहार व शाकाहार, २७
७. व्यायाम, २९, ६२, ९२, १२५, १६०, १९१, २२३, २५६, २८७, ३१९, ३५१, ३८१,
८. शहाण्यांचा मूर्खपणा, ३१
९. नात्झी पक्षांतील पाळींव डाक्टर ३१
१०. संततिनियमनाकरता शस्त्रक्रिया, ३२
११. मवाली राज्य, ३२
१२. लैंगिक नवमतवाद–२. ३३
१३. कायद्याचा चमत्कार, ४०
१४. खोट्या जाहिराती, ६०
१५. गरीब बिचारा ईश्वर ! ६३
१६. न्यायाचा एक मासला. ६४
१७. कामविषयक नवमतवाद–१. ६५
१८. क्षयरोग व उपोषण, ७१
१९. घटस्फोट ७४
२०. कांही सत्यकथा ७७
२१. वेश्यांचा उपयोग ९३
२२. धार्मिक कावा ९५
२३. विधवाविवाहाच्या कायद्याचा स्मृतिदिन ९६
२४. हिंदुस्थानची लोकसंख्या ९६
२५. कामविषयक नवमतवाद–२ ९७
२६. दोन बापांचा मुलगा १०२
२७. अस्सल–कमअस्सल १०६
२८. शारदाबाईस पत्र ११५
२९. केळीं खा १२६
३०. मलेरिआवर एक उपाय १२७
३१. तोंडाची घाण १२८
३२ सोव्हिएट् रशियांतील वेश्यावृत्ति १२९
३३. हिस्टेरिआ १३४

Y1m2:N27
155F7.9
289543.

# लैंगिक नवमतवाद-१

ई. आर्मां यांचे फ्रेंच लेखावरून

सवानऊ वाजेपर्यंत तुमची पत्नी तुम्हाला स्वर्गीय देवता भासत होती. जणूं काय तुमचें पृथ्वीवरील आयुष्य सह्य व्हावें म्हणून ईश्वराने ति मुद्दाम स्वर्गांतून तुमच्याकडे पाठवली होती. सर्वांगसुंदर अशी ही सगुणखनि तेथपर्यंत तुम्हाला अवर्णनीय आनंद देत होती. पण नऊ वाजून वीस मिनिटांनी तुम्हाला कळलें की या अप्रतिम पत्नीने काल, किंवा आठ दिवसांपूर्वी, गेल्या महिन्यांत किंवा कदाचित् सहा महिन्यापूर्वी असेल, तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाशीं तरी समागम केला होता. नऊ वाजून २५ मिनिटांनी ( कारण मत बदलायला निदान पांच मिनिटें तर पाहिजेत ! ) तीच अप्रतिम स्त्री तुम्हाला अत्यंत किळसवाणी वाटूं लागली आणि जिच्याबरोबर तुम्हीं इतकीं सुखें, आणि विशेषतः दुःखें भोगलीं, तिला कायमची दूर करण्यापलीकडे तुम्हाला कांही मार्ग दिसत नाहीसा झाला. याला तुमचीं धार्मिक, नैतिक, सामाजिक, काय कारणें असतील तीं असोत, परंतु माझ्या मताने याला तीनच कारणें असूं शकतील: अज्ञान, दुष्टपणा किंवा वेड.

कांही अपात्र माणसांचे बाबतींत स्वैरसमगमाचा परिणाम अनिष्ट होईल की नाही हा येथे प्रश्न नाही. लैंगिक स्वातंत्र्य, बौद्धिक स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, हे सर्व प्रश्न एकाच जातीचे आहेत. इतर बाबतींत स्वातंत्र्याची घोषणा करणें आणि लैंगिक बाब मात्र वगळणें हें समंजस नाही, तर्कशुद्ध नाही.

समागमाची अमुक एक पद्धत चांगली असें मी म्हणतच नाही. या बाबतींत एकेरी विवाह किंवा अनेकपदरी विवाह, सामुदायिक विवाह किंवा स्वैरसमागम, यांपैकीं ज्याला जें पसंत पडेल तें घेण्याचा किंवा अन्य प्रकारचे प्रयोग करून पाहण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला असला पाहिजे. आणि धर्म,

कायदा किंवा समाज, यांपैकी कोणीहि याच्या आड येतां नये व याबद्दल किंवा निंदा होतां नये, इतकेंच माझें म्हणणें आहे.

माझें असें ठाम मत आहे की प्रत्यक्ष समागमाशिवाय स्त्रीपु एकमेकांची लैंगिक दृष्टीने माहिती होत नाही आणि अशी माहिती ज्या व बद्दल नाही, अशा व्यक्तीशीं स्वतःला लैंगिक बाबतींत कायमचें बांधून घेणें कमालीचा मूर्खपणा आहे. बऱ्याच दिवसांचा अनुभव असल्याशिवाय अशीं व घालणें किंवा घालून घेणें, हा व्यक्तीवर आणि मानवजातीवर जुलूम आहे. असेंहि म्हणण्यास तयार आहें की स्वैरसमागमाचा कितीहि अतिरेक झ तरी हल्लीच्या विवाहपद्धतीपेक्षा त्यापासून जास्त नुकसान होणार नाही.

कांही व्यक्तींना पातिव्रत्य किंवा एकपत्नीव्रत पसंत पडेल आणि मान हें मला कबूल आहे. म्हणून अशा लोकांना इतरांस नियम घालून देण्य किंवा त्यांना नांवें ठेवण्याचा अधिकार कसा पोंचतो ?

संततिनियमनाचीं साधनें विकण्यासंबंधी फ्रान्समधे जो कायदा अ त्याबद्दल बहुतेक स्त्रिया कांहीच बोलत नाहीत हें कसें ? मर्जीविरुद्ध जिला मु होतात, तिला आर्थिक किंवा कोणत्याहि प्रकारचें स्वातंत्र्य कसें मिळणार स्त्रियांच्या मनांत असतें तर असे कायदे कधी झालेच नसते. पुरुष स्त्रियां केवळ सुखसाधन मानतात अशी तक्रार करणाऱ्या स्त्रियांनी लक्षांत ठेवावें ही केवळ पुरुषांचीच चूक नाही.

गाईला किंवा घोडीला संतति उत्तम बैलापासून किंवा घोड्यापासून व्हाव हें कबूल करणारे लोक स्त्रीचे बाबतींत मात्र दुबळ्या पतीपासून संतति होण पेक्षा इतर सुदृढ मनुष्यापासून होणें इष्ट आहे हें विधान भयंकर अनीतीचें स जतात. परंतु हें शास्त्रीय सत्य नव्हे का ?

कांही लोक कदाचित् असें म्हणतील की स्वैरसमागमास परवान दिल्यास संततीची वाट काय ? आणि रोगांचा प्रसार होईल त्याचें काय ? या उत्तर इतकेंच की कांही लोकांनी स्वैरसमागमाचे दृष्टीने जर एखादा संघ के तर त्यांना जरूर पडल्यास संततीचा व रोगांचाहि प्रतिबंध करणें सोपें आहे.

# लैंगिक नवमतवाद

लैंगिक स्वातंत्र्य पाहिजे असें आम्हीं म्हटलें की लोक म्हणतात आम्हाव भावना नसल्यामुळे प्रेमभंगाच्या यातना आम्हाला कळत नाहीत. हा आरो सर्वथैव खोटा आहे. आमचें म्हणणें असें आहे की आमच्या भावना कितीं दुखावल्या तरी कोणालाहि मर्जीविरुद्ध जखडून ठेवण्याचा आम्हाला हक्क ना आणि त्याचप्रमाणे आम्हालाहि जखडून ठेवण्याचा कोणाला हक्क नाही. बाबतींत पुरुषाची स्त्रीवर किंवा स्त्रीची पुरुषावर सत्ता चालतां नये.

सुदृढ प्रकृतीच्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या मनांत अनेक व्यक्तींबद्दल लैंगि आकर्षण उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. हें जर खरें, तर या आकर्षणाला व न देतां प्रत्येक व्यक्तीला दुःख भोगायला लावण्यांत कोणाचा फायदा आहे धर्मबाजी, नीतिबाजी आणि कायदेबाजी बाजूला ठेवल्यास यांत कोणालाहि सु नाही. त्यापेक्षा या आकर्षणाला वाव देऊन सर्वांना सुखाचा मार्ग सुलभ करु देणें बरें नव्हे का? धर्म फेकून देतां येईल, नीति नेहमीच बदलत असते आ कायदेहि बदलतां येतात. मनुष्यजातीच्या सुखाकरता हें सर्व बदलण्यास क हरकत आहे?

बायको चोरणें हें बायबलाप्रमाणे पाप आहे. बायबलांत अनेक गो ईश्वराला नापसंत असल्याचें सांगितलें आहे. त्यांत असेंहि सांगितलें आहे बापाची बायको (म्हणजे आईच असें नाही, कारण त्यावेळीं अनेक बायका अस किंवा आपली बहिण, सून, आत, मावशी वगैरेंना नग्न पाहूं नये; भावजयी संबंध ठेवूं नये; एकाच मनुष्याने आईशीं व मुलीशीं संबंध ठेवूं नये ( यांपै कांही गुन्ह्यांना मृत्युदंड सांगितला आहे ); लज्जाहीन किंवा व्यभिचारी लं स्वर्गांत जात नाहीत. तुम्हाला शरीर ईश्वराकडून मिळालें आहे, त्यावर तुम हक्क नाही. आजचे सर्व कायदे यावरच बसवलेले आहेत हें उघड आहे, प आम्ही पुढारलेले, आम्हाला धर्म नाही, असें जोराने सांगणारांना तरी त्य महत्त्व वाटतां नये. नाइलाज म्हणून कायद्यांप्रमाणे वागावें लागल्यास ग निराळी. परंतु पाहूं जावें तर पुढारलेल्या समाजसत्तावाद्यांत देखील इत समजूत दिसत नाही.

वस्तुतः जे गरजेला उपयोगी पडतात तेच स्नेही समजण्यास योग्य आहेत. या व्याख्यतून लैंगिक गरजा कां वगळाव्या, याला कांही शास्त्रीय, तात्त्विक किंवा नैतिक कारण नाही. आणि अशा विधानांनी ज्यांच्या मनाला धक्का बसतो ते धर्माच्या तावडींतून अजून सुटलेले नाहीत असेंच मी समजतों. अर्थात् एकाच्या गरजांकरता दुसऱ्यावर जुलूम किंवा अत्याचार होतां नये आणि कांही स्नेह्यांनी असा एखादा संघ काढल्यास ज्यांना हें पसंत असेल तेच त्यांत सामील होतील, इतरांनी होऊं नये. म्हणून अशा संघाला कोणी नांवें ठेवण्याचें कारण नाही.

रजिस्टर विवाह करणें म्हणजे भटांना धाब्यावर बसवणें आहे, विवाहाशिवाय जोडप्याने एकत्र राहणें म्हणजे भटांबरोबरच सरकारी रजिस्ट्रारलाहि धाब्यावर बसवणें आहे. ही एक पायरी पुढे आहे पण स्वैरसमागम म्हणजे त्यापेक्षाहि एक पायरी पुढे आहे.

बौद्धिक, आर्थिक, शास्त्रीय किंवा क्रीडाविषयक संघांत सामील होणें सर्वांच्या अंगवळणीं पडलेलें आहे. त्याचें कोणाला कांही वाटत नाहीं. पण प्रेमसंघाचें कोणी नांव काढल्यास लोकांच्या कपाळाला आठ्या पडतात आणि याचें कारण शोधूं गेल्यास असें दिसतें की अधार्मिक म्हणवणारे लोक देखील धार्मिक असतात.

प्राचीन कालीं कांही लोकांत पाहुण्याला ज्याप्रमाणे उत्तम अन्न किंवा इतर सोयी, त्याचप्रमाणे उत्तम स्त्रीही पुरवण्याची चाल असे, आणि उत्तम पक्वान्न पाहुण्याने न खाल्ल्यास गृहिणीला जसें वाईट वाटेल, तसेंच पाहुण्यानें त्या स्त्रीचा स्वीकार न केल्यास यजमानाला वाईट वाटत असे. हा उच्च प्रतीचा पाहुणचार होता, कांही लेखक म्हणतात त्याप्रमाणे अनीतीचें लक्षण नव्हतें.

चुंबन, पीडन, आलिंगन, समागम वगैरे शारीरिक गोष्टींना कमी प्रतीच्या लेखणें न्याय्य नाही. मानसिक गोष्टी देखील शारीरिक जीवनाचाच परिणाम होत. तेव्हा मानसिक म्हणजे उच्च आणि शारीरिक म्हणजे नीच समजण्याचें कारण नाही. स्त्रीपुरुषांमधील आकर्षणाचें आविष्करण परिस्थिती-

प्रमाणें कधी मानासिक व कधी शारीरिक होईल. त्यांत असा भेदभाव करणें चूक आहे.

मी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आहें. व्यक्तीला जसें एकलकोंडें राहण्याचें स्वातंत्र्य आहे, त्याचप्रमाणे संघ करण्याचेंहि स्वातंत्र्य पाहिजे. ज्याप्रमाणे शास्त्रीय किंवा आर्थिक दृष्टीने केलेल्या प्रयोगांत एक दोन, दहा किंवा अधिक स्नेही भाग घेऊं शकतील, तसेंच लैंगिक प्रयोगांत कां असूं नये? कांही लोकांनी एखादा संघ करून जर असें ठरवलें की त्यांतील कोणत्याहि व्यक्तीने दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीला समागमाचे बाबतींत नकार देऊं नये, तर असा संघ करण्याची त्यांना पूर्ण मोकळीक असावी. अर्थात् कांहीतरी बाबतींत समानशील लोक असतील, तेच असा संघ करूं शकतील. असा संघ कोणत्याहि शारीरिक किंवा मानसिक बाबींवर उभारलेला असला तरी त्यामुळे त्याला उच्च किंवा नीच समजण्याचें कारण नाहीं.

माझें एखाद्या स्त्रीवर प्रेम असेल आणि ती जर मला नकार देत नसेल, तर ती वरील प्रकारच्या एखाद्या संघांत गेल्याचें मला मुळींच दुःख नाही. माझें समाधान होतें की नाही एवढेंच मी पाहातों, बाकीच्या जगाच्या उठाठेवी मला काय करायच्या? माझें समाधान झालें, म्हणजे मला असूया वाटायला जागाच नाहीं.

पण एखादी स्त्री जर केवळ 'प्लॅटॉनिक् लव्ह्' (वासनारहित प्रेम) मला देऊं पाहील तर तें मला मुळींच कबूल नाहीं. हें माझें व्यक्तिस्वातंत्र्यच आहे. वासनारहित प्रेम मला अपुरें वाटतें, त्याला मी काय करूं?

ॲडॅमाइट पंथांतील स्त्रिया रस्त्यांत नग्न हिंडत असत आणि स्वैरसमागम करीत असत, व त्याबद्दल त्या पैसा घेत नसत. त्या आपली वागणूक बदलण्यास तयार नव्हत्या म्हणून त्यांना १४५१ सालीं जिवंत जाळण्यांत आलें. त्या गात गात आनंदाने मेल्या.

वर सांगितल्याप्रमाणे जर कोणीं संघ स्थापन केला तर त्यांतील कोण-

त्याहि व्यक्तीने शक्य असेल तोंपर्यंत समागमास नकार देतां नये असा नियम असला पाहिजे, कारण एरवी कित्येक स्वार्थी लोक स्वतःची मात्र सोय पाहतील आणि दुसऱ्याची सोय करण्याची वेळ आल्यास मागे घेतील. अशा व्यक्तींनी संघांत जातां नये.

प्रस्तुत एकेरी कुटुंबव्यवस्थेंत पतिपत्नी एकमेकांत इतकीं गढून जातात की त्यांना एकमेकांचे दोष देखील लागतात आणि सामाजिक दृष्टीने त्यांची किंमत कमी होते. यासाठी मी असें म्हणतों की कुटुंब प्रवाही स्थितींत असावें म्हणजे पतिपत्नींची मधूनमधून अदलाबदल करावी, मुलें देखील एका कुटुंबांतून दुसऱ्या कुटुंबांत जावीं, म्हणजे नेहमी नवीन प्रकारांची संवय होऊन मनुष्यांत जास्त जीवंतपणा राहील.

मला कोणी पाहुणा म्हणून बोलावल्यास ज्याप्रमाणे माझी इतर सोय होईल त्याप्रमाणें लैंगिक गरजाही भागल्या पाहिजेत असें माझें मत आहे. एरवी मी पाहुणा जाणार नाही.

लहान मुलांना त्यांच्या मर्जीविरुद्ध जन्मावें लागतें आणि त्यांना आईबाप किंवा भावंडें कशीं असावीं, या बाबतींत त्यांचा कोणी सल्ला घेत नाही. तेव्हा आपलें कुटुंब सोडून दुसऱ्या कुटुंबांत जाण्याची इच्छा असल्यास आणि त्या कुटुंबाने तें कबूल केल्यास त्यांना जाऊं द्यावें. त्यांनाहि व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे असें मला वाटतें.

१० व्या पासून १६ व्या शतकापर्यंत स्वैरसमागम रूढ असलेले पुष्कळ पंथ सर्व युरोपभर पसरलेले होते. त्यांच्यांत दारिद्य नव्हतें, न्यायाधीश नव्हते, भांडणें नव्हतीं. लहान मुलांची त्यांच्यांत जशी चैन होती, तशी एकेरी कुटुंबांत कधीच नसते. या पंथांत बाप कोण हें माहीतच नसतें, त्यामुळे ज्या पुरुषांना मुलांची खरोखर आवड असेल ते सर्व मुलांचे सारखेच लाड करीत.

कांही स्त्रीपुरुषांना एकच पति किंवा एकच पत्नी करण्याची पद्धत मनापासून पसंत असेल, असें मी तात्त्विक दृष्ट्या कबूल करीन. पण मला बहुधा

असेंच दिसतें की पातिव्रत्याच्या किंवा एकपत्नीत्वाच्या पुरस्कर्त्यांपैकी बहुतेकांना समाजाची भीति वाटत असते, किंवा आपण उघडपणें इतरत्र संबंध ठेवल्यास पति किंवा पत्नी आपणास सोडून जाईल ही भीति असते. म्हणजे त्यांचें मत भीतीमुळे बनलेलें असतें, ती त्यांची खरी आवड नव्हे. परंतु माझें म्हणणें असें आहे की, पुष्कळ स्त्रियांशीं किंवा पुरुषांशीं संबंध ठेवल्याने मनुष्याचा जास्त विकास होतो आणि सामाजिक किंमत वाढते. ग्रीक लोक एकेरी पद्धतीचे भोक्ते नव्हते आणि कलेच्या व तत्त्वज्ञानाच्या बाबतींत त्यांनी सर्व जगाला ऋणी करून ठेवलें आहे.

भरपूर कामवासना असणें हें सुदृढ प्रकृतीचें लक्षण आहे. ती नैसर्गिक आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तें व्यसन नाही. दारुची किंवा तंबाखूची इच्छा कोणाला आपोआप होत नाही. या संवयी लावून घेतांना त्रास होतो, परंतु भिन्नलिंगी व्यक्तींचें एकमेकांविषयीं आकर्षण सहजिक असतें. त्यांनी पायरीपायरीने समागमापर्यंत पोचणें हेंहि नैसर्गिक आहे. त्याला समाजाची काय आडकाठी असेल तेवढीच.

एखादा मनुष्य कोणालातरी नग्न पाहिल्याबद्दल पोलिसाकडे तक्रार करतो. त्याच्या हें लक्षांत येत नाहीं की तो स्वतः आपला चेहरा आणि हात नेहमी लोकांना दाखवीत असतो आणि हे अवयव कोणाला आवडतात की काय याची तो मुळीच फिकीर करीत नाही. कोणाचा चेहरा कितीहि कुरूप असला तरी तो मला पहावा लागतो. मी जर याबद्दल तक्रार करूं लागलों तर लोक मला म्हणतील, तिकडे पाहूं नका, मग शरीराचा मध्यभाग उघडा दिसल्याबद्दल तक्रार करणाराला असेंच कां सांगू नये ? ही केवळ परंपरा आहे, तिला झुगारून कां देऊं नये ?

लैंगिक बाबतींत खरोखर पुढारलेले कोणाला म्हणावें ? ज्यांना लैंगिक बाबतींत इतर कोणत्याहि विषयाइतकेंच मोकळ्या मनाने बोलतां येतें आणि ज्यांना या विषयाची कोणत्याहि प्रकारची लाज वाटत नाही किंवा हा विषय अश्लील वाटत नाही, तेच खरे पुढारलेले समजावे. ज्यांना या विषयाची लाज

वाटेल किंवा तो अश्लील वाटेल, त्यांचें मन शुद्ध असणें शक्य नाही. अश्लीलते-संबंधी कायदे करणारे स्वतःच अशुद्ध मनाचे असतात. शुद्ध मनाला कशांतहि अश्लीलता दिसत नाही.

ज्याला स्वतःच्या किंवा इतरांच्या कामवासनेसंबंधी व तदनुषंगिक इतर गोष्टींसंबंधी विचार करतांना लाज वाटते, तो अजून शुचिर्भूत झाला नाही, त्याच्या मनांत अजून धर्माची घाण शिल्लक आहे.

---

# अपघात की खून ? ( सत्यकथा )

लेखक, माधवराव बागल, कोल्हापूर.

दाजी पाटलाचें हें चौथें लग्न. यावरून ते वयाने बरेच असावेत असें कोणाला वाटेल, पण त्यांना पाहिलें म्हणजे आपली चूक प्रत्यक्षच दिसेल. ते अगदी तरुण होते, तीसबत्तिशीच्या आंतच वय असेल. भव्य शरीर, मोठ्या हाडाचा, मेहनतीचें अंग, खाऊनपिऊन सुखी. खेड्याची रहाणी, स्वच्छ, निरोगी हवेंत वावरणें, प्यायला वाटेल तितकें दूध, धारोष्ण. यामुळे आणखी ४० वर्षें जातीं तरी उतार वयाचा परिणाम नाही दिसणार. या हवापाण्याने रोगी देखील सुदृढ होणार. मग दाजी तर मूळचाच निरोगी आणि कणखर. आणि त्यांत तालीमबाज. मग काय विचारतां ? बुद्धीला काम नाही. शरीराने बुद्धीवर मात केली होती म्हटलें तरी चालेल. संस्कृतीचा बिलकुल परिणाम झालेला नाही.

पण हें हवापाणी, रहाणी व अन्न, यांचा परिणाम दाजीच्या बायकांवर मात्र होत नसे. लग्नानंतर फारच थोड्या कालांत त्या पुण्यधामीं जायच्या ! नवऱ्याच्या अगोदर बायकोला मरण येणें म्हणजे भाग्याचीच गोष्ट. पुण्यवान स्त्रीलाच तें लाभायचें. असें मरण यावें म्हणून कितीतरी भाविक बायका

नवस करीत असतात. तेव्हा दाजी पाटलाच्या हातून हें एक पुण्यकर्मच होतः होतें म्हणायचें !

पण त्या बायकांच्या आईबापांना मात्र ही दृष्टि नव्हती. मुलींना संसारसुख कसें तें पहायला मिळायचें नाही. इहलोकींच्या देवाची ओळख होते न होते तोंच स्वर्गीच्या देवाकडे जावें लागायचें. त्या अजाण पोरींनाही धर्माची इतकी कल्पना नसल्यामुळे त्यांनाही वाईट वाटे. पण त्यांच्या मरणाला तो कांही जबाबदार नव्हता. दाजीची वर्तणूक केव्हाही धर्मबाह्य झाली नव्हती. तो गांवच्या भटाबामणांच्या सल्ल्यानेच पतिधर्माने वागत असे.

दाजीचे आईबाप जिवंत होते. हुंडापांडा, होय नव्हे, सगळें तेच ठरवीत आणि मुलगीहि लहानच ठरवीत. कारण मुलगी थोरवट असली म्हणजे उर्मट असण्याचा संभव, आणि मुलावर छाप ठेंविली म्हणजे मुलगा बायकोच्या स्वाधीन व्हायचा, आणि वडिलांचा अपमान करायचा. आणि घरकामालाहि आज्ञाधारक मुलगी बरी. तेव्हा ते लहानच मुलगी पहात.

हें चौथें लग्न. सावित्रीच्या आईबापांनी चांगला भरपूर हुंडा दिला. मुलगी एकुलती एक, आणि दाजीचें लग्न चौथें असलें तरी मुलीचें पहिलेंच. त्यांनी लग्नसोहाळा मोठ्या हौसेने केला. वाजंत्री, मंडप, आरास, दारूकाम, नक्षत्रमाळा वगैरे सर्व थाट झाला.

पण ती अजून मुलगीच होती. तिला बायको व्हायला अद्याप एक वर्ष तरी जायला पाहिजे होतें. सासरीं गेल्यावर सासूसासऱ्यांची आज्ञा मानायची. नवरा हाच या लोकींचा देव समजून त्याचा कोणताही शब्द मोडायचा नाहीं, अशी शिकवण तिला आईबापांनी हजार वेळां बजाऊन दिली होती. पण प्रत्येक गोष्टीचा उलगडा कसा करणार ? आईबाप आपली मर्यादा कशी सोडणार ? कांही बाबतींत मुलीला अज्ञानांत ठेवणें हाच धूर्तपणा. त्या आपोआप समजणारच !

सावित्री अगदी पडेल तें काम करीत असे. सासूसासऱ्यांचा शब्द तिने खाली पडूं दिला नाहीं. हाताखालचें स्वयंपाकाचें सर्व काम करून पुनः पडलेले.

कपडे नदीवर जाऊन धुवून आणायची. खेड्यांतली मुलगी, कळूं लागल्यापासून कामाची संवय. तिला कामाचा कंटाळा नव्हता आणि असेंच चाललें असतें तर तिला जिणें जड वाटलें नसतें. पण तिच्यापुढे वाढून ठेवलेल्या गोष्टीची तिला कल्पनाहि नव्हती. ती असती तर तिने पळच काढला असता. येणारी आपत्ति कळती तर कांही लग्नसोहळ्यांत तिचा चेहरा आनंदी दिसला नसता. अर्थात् आणखी कांहीं काल जाता तर ती आपत्ति म्हणणेंच चूक झालें असतें.

लग्न होऊन कसाबसा महिना उलटला असेल. त्या दिवशीं सासू सावित्री-बरोबर फारच गोड बोलली. तिने तिला गोंजारलें, पाठीवरून हात फिरवला, चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. ती म्हणाली, ' स्त्रीला नवरा म्हणजेच देव. जगांत दुसरा देव नाहीं, त्याची सेवा हेंच पुण्य. नवऱ्याची आज्ञा–मग ती कसलीहि असो–बायकोने ऐकली नाही तर तिला भयंकर पाप लागतें. नरकांत जावें लागतें. आज्ञा ऐकण्यांत आपल्याला त्रास सहन करावा लागला तरी ती पुण्याईच पदरीं पडते. '

अशी सासूने मनाची तयारी केली, पण हें एवढें कशाकरता तें मात्र तिला समजलें नाहीं. आपण काम नेहमीच ऐकतों. मग आज हें इतकें कां ? असें वाटून मनांत भीति उत्पन्न झाली आणि अनेक तर्कवितर्क येऊं लागले. रात्री जेवणखाण आटोपल्यावर सासूने, ' नवरा बोलावतो आहे जा, सांगितलेलें विसरूं नकोस. ' असें सांगून तिला त्याच्याकडे धाडली

नवरा कसला ? पशूच तो ! चार गोड शब्दहि बोलला नाही, तिच्या पोरवयाकडे लक्ष दिलें नाही. नवऱ्याला संमतीची आवश्यकता थोडीच असते ! लग्न बायकोच्या सुखासाठी थोडेंच असतें ? एक उपभोग्य वस्तु यापेक्षा तिला जास्त किंमत काय ? त्याने तिच्या मर्जीविरुद्ध आपल्या हक्काची बजावणी केली नवऱ्याची आज्ञा म्हणजे देवाची आज्ञा. ती तिला अगदी देवाज्ञेप्रमाणे भासली. भावी स्वर्गसुखासाठी पतिदेवांनी तिला यमयातनांचा अनुभव दिला. निसर्गाचीच कृपा म्हणायची की पुढे त्या समजण्याइतकी तिला शुद्धच राहिली नाही. तथापि त्याने जी विटंबना करायची ती केलीच.

शुद्धीवर येतांच ती किंकाळ्या फोडून रडूं लागली. रडून प्रदर्शन करण्याची ही गोष्ट नव्हे, असें म्हणून सासूने समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याचा उपयोग झाला नाही. तेव्हां गप रहाण्याकरता तिला सासूसासऱ्यांच्या हातचा मार खावा लागला. या प्रसंगामुळे नवऱ्याविषयी आदर, भक्ति, प्रेम या सर्व कल्पना नाहीशा झाल्या, सासरीं सर्व माणसें आपले शत्रू आहेत असें तिच्या मनाने घेतलें. नवरा म्हणजे एक भयंकर मनुष्य आहे, क्रूर प्राणि आहे, असें तिला वाटूं लागलें. त्याला पाहिलें की ती भीतीने कापूं लागे, हातापायांचा आधार तुटल्यासारखें होई. तो कोठेहि एकटा दिसला तर ती त्याला झटकन् चुकवून जाई.

दवाखान्यांत पडून रहाण्याजोगी तिची स्थिति होती, पण सांगणार कोणाला ? सांगण्याजोग्या गोष्टीही नव्हत्या आणि तेथे कोणी जिव्हाळ्याचें माणूसहि नव्हतें. सासूसासऱ्यांनी तर तिला जाणून बुजून त्या राक्षसाच्या जबड्यांत ढकलली होती.

तिला बरें वाटण्याचीहि त्याने वाट पाहिली नाही. मधे दोनच दिवस गेले, पुनः तोच प्रसंग. त्याने स्वतःच्या सुखापलीकडे कांहीच पाहिलें नाही. या गोष्टीला रूढींची आणि धर्माची परवानगी होती. या अत्याचाराविरुद्ध कोणाला ब्र काढतां येत नव्हता. स्त्री म्हणजे जणूं नवऱ्याच्या मालकीची निर्जीव चीजवस्त. तिने प्रतिकार करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्या निर्बल पोरीचें काय चालणार ? दहा जणांना भारी असा धटिंगण होता तो. त्याने तिला ओढीतच खोलींत आणली. ओरडली तर एक तोंडांत भडकावली. तथापि तिचें रडें थांबेना, तेव्हा तोंडांत बोळा दिला आणि तिच्याकडून स्त्रीचें कर्तव्य पार पाडवलें.

'याचकरता माझ्या आईबापांनी माझें लग्न केलें काय ! मी त्यांना नको होतें काय ? पण त्यांना तरी या गोष्टी माहीत असतील काय ? ज्यांनी मला लहानाची थोर केली, अनेक लाड पुरवले, ते या गोष्टीला कशी संमति देतील ?'

माहेर फार लांब नव्हतें. खेड्यांतल्या मुलींना बाहेर जायची मोकळीक असतेच. शेजारीं जाण्याच्या निमित्ताने तिने घराच्या बाहेर पाऊल टाकलें, तें माहेरीं पोंचेपर्यंत थांबवलें नाही.

घरीं पाय टाकतांच ती आईच्या गळीं पडून रडूं लागली, आणि म्हणाली ' मी नाही जाणार आता तिकडे. जीवच घ्यायचा तर तुझ्या हातानेंच घे जीव माझा. पण त्या चांडाळाकडे पाठवूं नकोस. प्राण गेला तरी मी नाही जाणार आता.' असें म्हणून ती अगदी गडबडां लोळूं लागली. आईला पण राहवलें नाही. मायलेकी पोट भरून रडल्या. बापाला हकीकत समजली तेव्हा त्यालाही जांवयाचा फार संताप आला. पण मुलीची बाजू म्हणजे नेहमी पडती. मुलीला घरीं कशी ठेवून घेणार? विषच तें! ती पळून आली असें गांवच्या लोकांना समजलें तर केवढा बदलौकिक! तो मोठ्या पेंचांत पडला. पोरीची तर कींव आली, पण एकदा लग्न झाल्यावर आईबापांची मुलीवर काय सत्ता?

काय करावें या विचारांत आईबाप होते, इतक्यांत जांवईबोवांची स्वारी जातीने हजर झाली. ती दुसरीकडे कोठे जाणार, म्हणून ते थेट तिच्या माहेर-लाच आले. बायकोला न्यायलाच आले होते ते. पाठवीत नाही म्हणण्याची त्यांची छाती नव्हती. धर्माने व कायद्याने तिच्यावर नवऱ्याची मालकी होती. तो त्यांचाच जिन्नस होता. त्याची विल्हेवाट ते कशीहि लावतील.

तथापि आईबापांचें आंतडें, पोटचा गोळा तो. त्यांना तिचें हाल कसे पाहवतील? भीत भीत ते म्हणाले, ' आलीच आहे तेव्हा राहूं या कांही दिवस. थोड्याच दिवसांत पोंचवतों आणून, आपल्याला तसदी घेण्याचें कारण पडणार नाही. आता सणहि आला आहे तेवढा करून जाईल. आपणहि रहा कांही दिवस' म्हणून त्यांनाही आग्रह केला.

पण जांवईबोवा फारच गरम झाले होते. त्यांच्या सुखाची पर्वा केल्या-शिवाय ती पळून आली होती. रागामुळे ते सौजन्य विसरले. सासऱ्याची त्यांनीं भीड मुरवत बाळगली नाही, ते अगदी एकेरीवर आले. अखेर पोरीचे हाल

होत आहेत हें पाहूनहि त्यांना तिचा बचाव करतां आला नाही. त्यांनी स्वतःच तिला सासरीं पोंचती केली. शिवाय जांवईबोवांचा राग शांत करण्याकरता शेलापागोट्याचा खर्च केला तो निराळाच.

पण जातांच तिची खोड मोडण्याचें जांवईबोवांनी ठरवलें होतें. लग्नाच्या बायकोने त्यांचा उपमर्द केला होता ! त्याच रात्रीं त्यांनी तिला खांबाला बांधून चांगली झोडपली आणि मग तिच्यावर पत्नीधर्म पाळण्याची आसुरी जबरदस्ती केली. आपलें आयुष्य यापुढे असेंच जाणार असें वाटून तिनें भयंकर भीति घेतली. आईबाप आपल्याला वांचवूं शकत नाहींत. सासूसासरा उलट नवऱ्यालाच सहाय्य करीत आहेत. आपल्याला तारणारें जगांत आपल्याखेरीज कोणी नाही.

तिने या संकटांतून आपली सुटका करून घेण्याचा अगदी निश्चय केला. कांही दिवस गेले, तिने सर्व दुःख मुकाट्याने सहन केलें. चेहऱ्यावर हास्य आणण्याचाही प्रयत्न केला. हा बदल झालेला पाहून सासूसासऱ्यांना बरें वाटलें

ती पुनः पळून जाईल म्हणून तिला फार दिवसांत नदीवर पाठविली नव्हती. आता त्यांनीच आपण होऊन पाठवली. तिला मोकळीक मिळावी म्हणून नव्हे, त्यांचें काम व्हावें म्हणून. ती कपडे घेऊन नदीवर धुण्यास गेली, नदी दुथडी वहात होती. ती घाटाची एकएक पायरी उतरूं लागली. कोपऱ्यावर मोठा घातुक भोवरा होता. ती आपण होऊनच तिकडे निघाली आणि थेट भोवऱ्यांत गेली.

त्या भोवऱ्यांत गेलेलें मनुष्य कधींच जिवंत बाहेर आलेलें नव्हतें. घाटावर गडबड झाली. लोकांना वाटलें पाय निसरून गेली असावी. पोहणाऱ्यांनी उड्या टाकल्या, पण तिचें प्रेत मात्र त्यांना सांपडलें. अपघात म्हणून पंचनामा झाला.

असे अपघात कितीतरी होत असतील ! पण जगाला काय माहीत ! याला अपघात म्हणायचें की खून?

---

# पोंच व अभिप्राय

——*०*——

१. समईतील ज्योत, लेखक व प्रकाशक, श्री. **ना. के. शिरोडकर**, श्रीहरिनिवास, गोवालिया टँक, मुंबई.

ही तीन अंकी नाटिका 'नवयुग नाट्य कॉर्पोरेशन' या नाट्यसंस्थेने १६ फेब्रुवारी १९३५ रोजीं रॉयल ऑपेरा हाऊसमधे रंगभूमीवर आणली असें समजतें. परिस्थितीमुळे चांगला मनुष्य देखील वाईट काम करूं शकेल असें दाखवण्याचा यांत प्रयत्न केला आहे. तात्त्विक दृष्ट्या पाहिल्यास कोणतीहि गोष्ट परिस्थिती-मुळेच घडत असते, मात्र परिस्थितीत आनुवंशिक संस्कार आणि जन्मापासूनची त्या क्षणापर्यंतची परिस्थिति या सर्वांचा समावेश केला पाहिजे. यांपैकी एकहि गोष्ट बदलणें कोणाला शक्य नसतें, तेव्हा तात्त्विक दृष्ट्या कोणत्याहि दुष्कृत्या-बद्दल कोणालाहि दोष येणार नाही, परंतु लेखकाचे मनांत नाटकांतील कांहीं पात्रांविषयी मात्र सहानुभूति दिसते, सर्वांविषयीं दिसत नाही. बहिण आजारी आहे तिला पाजण्याकरता दिनेश दूध चोरतो, तुरुंगांत जातो, नंतर अधिक संकटें आल्यामुळे दारू पिऊं लागतो. त्याची दुसरी बहिण नीलन बहिणीचा जीव वांचवण्याकरता म्हाताऱ्या डाक्तराशीं लग्न करायला तयार होते, आणि एक बायको जिवंत असलेला डाक्तर त्रिशूळ तिला बरी करण्याकरता नीलनशीं लग्न करण्याची अट घालतो. इतर पात्रांबद्दल आणि दारुड्या चोराबद्दल देखील सहानुभूति आणि डाक्टराबद्दल मात्र किळस उत्पन्न करण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. तो एरवी साहजिक आहे, पण ज्याअर्थी परिस्थितीचा मुद्दा लेखकाने प्रामुख्याने पुढे आणला आहे, त्याअर्थी त्या दृष्टीने विचार केल्यास डाक्टरही परिस्थितीचेंच खेळणें आहे. कामवासना स्वस्त्रीशिवाय इतरांबद्दल उत्पन्न झाल्यास ती गैर समजण्याची रीत आहे, परंतु वस्तुत: त्यांत वाईट काय आहे आणि ती उत्पन्न होणें न होणें कोणाच्या मर्जीवर असतें काय? आता कोणी असें म्हणेल की इच्छा उत्पन्न झाली यांत कांही मोठेंसें बिघडलें नाही,

परंतु त्यानें ती आत्मसंयमनानें दाबायला पाहिजे होती. परंतु आत्मसंयमन करण्यास तें करण्याची शक्ति पाहिजे इतकेंच नव्हे तर इच्छाही पाहिजे. नीतिबाज लोक म्हणतील की आत्मसंयमन कोणालाहि करतां आलेंच पाहिजे आणि तें करण्याची इच्छा नव्हती हीच तर त्याची चूक आहे! परंतु शांतपणें विचार केल्यास असें दिसेल की आत्मसंयमनाची शक्तिहि सर्वांस असणें शक्य नाही आणि तशी इच्छा होणें हेंहि परिस्थितीवरच अवलंबून असतें. आनुवंशिक प्रवृत्ति, शिक्षण व इतर परिस्थिति, या सर्वांमुळे ती उत्पन्न होते किंवा होत नाही. यापैकी कशाबद्दल डाक्तराला जबाबदार धरतां येईल? विचार केल्यास असें दिसतें की यापैकी एकाही गोष्टीबद्दल तो जबाबदार नाहीं. मग परिणामाबद्दल तो जबाबदार कसा? आणि जर जबाबदार नसेल तर इतरांप्रमाणेंच त्याचेबद्दल सहानुभूति कां वाटूं नये? इतका खोल विचार कोणी करीत नाही ही गोष्ट वेगळी. यांतील कांही भाग केवळ तात्त्विक चर्चेला वाहिलेला आहे आणि प्रयोगांत तो कंटाळवाणा होण्याचा संभव आहे. तथापि प्रयोग एकंदरींत बरा व्हावा असें वाटतें.

२. **विरलेलें स्वप्न,** लेखिका, विभावरी शिरूरकर, बी. ए. प्रकाशक हरी विष्णु मोटे, प्रतिभा कचेरी, मुंबई-२. किंमत एक रुपया.

---

# पत्रव्यवहार

## १.

१. वादकुशलांची अशी एक ठराविक पद्धत असते की जो मुद्दा आपणास अमान्य असेल तो सोडून भलत्याच गोष्टीला निष्कारण महत्त्व द्यावयाचें. हुबेहुब अशीच गोष्ट आपण माझ्या पत्राला उत्तर देतांना केली आहे. माझा हिटलरची तरफदारी करण्याचा मुळीच हेतु नसून त्याच्या विशिष्ट धोरणावर मला चर्चा करावयाची होती व त्यापासून आपणांस काय घेतां येईल हें पहावयाचें होतें. आपण मुसोलिनीला सुशिक्षित म्हणून गौरवतां पण त्याने तरी व्यक्ति-

स्वातंत्र्याचा कितीसा बोज ठेवला आहे ? आणि स्त्रीस्वातंत्र्याला कितीशी किंमत दिली आहे ? किंबहुना झोटिंगशाहीचा तोच आद्यगुरू होय असें म्हणण्यास हरकत नाही. दुसरें असें की राष्ट्रहितकर्ता हा सुशिक्षितच असला पाहिजे हें म्हणणें चूक आहे. तो मुत्सद्दी आणि पूर्ण राष्ट्रहितैकदृष्टि असला म्हणजे झालें. आमच्या शिवाजीमहाराजांना लिहितां वाचतां येत होतें की नाही याबद्दल इतिहासज्ञांस संशय आहे, पण त्यांनीं नाही का आपल्या मुत्सद्दीपणाने व शौर्याने राष्ट्राचें हित साधलें ? राष्ट्रहित साधण्यास विद्वानांची व पंडितांचीच गरज असती तर सुधारलेल्या देशांनी आपलीं राज्यसूत्रें मुत्सद्यांच्या हातीं न देतां विश्वविद्यालयांच्याच स्वाधीन केलीं असतीं. हल्ली प्रत्येक राष्ट्र युद्धाची कसून तयारी करीत आहे अशा वेळीं हिटलर जर तशी तयारी करीत असेल तर तेंच योग्य ठरेल. किंबहुना हिंदी राष्ट्रानेही अशी संधि न गमावतां आपणांस फायदेशीर होईल असा प्रयत्न यावेळीं जागरूकपणें केला पाहिजे. कारण राजसत्ता हातीं असली तर सामाजिक सुधारणा चुटकीसरशा करतां येतात. पण राजकीय सुधारणा अशा संधींनीच होत असते. म्हणून त्या दृष्टीने प्रयत्न न करतां आम्ही केवळ सामाजिक प्रश्नांचाच काथ्याकूट करीत बसलों तर ती एक घोडचूक होईल व त्यामुळे पुढे पश्चात्तापाची पाळी येईल यांत शंका नाही. २. मंत्रशक्ति खरी आहे की नाही असा प्रश्न बरेच वेळां उत्पन्न होतो. ती नाही असें म्हणावें तर आम्हीं प्रत्यक्ष सर्पदंश झालेला मनुष्य मंत्राच्या सामर्थ्याने उतरल्याचें पाहिलें आहे व मला स्वतःला विंचू चावला असतां तो मंत्राने उतरला आहे. तरी ती शक्ति असल्यास तिचें स्वरूप कोणतें असावें ? एक वर्गणीदार

उ. आपण जी वादकुशलांची पद्धत म्हणतां ती निदान आमची पद्धत नाही, तेव्हा आम्ही कदाचित् वादकुशल नसूं. आपल्या प्रत्येक मुद्याला उत्तर देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्हीं केलेला आहे. आमचें उत्तर आपणांस पटलें नाही तर आमचा इलाज नाही. हिटलर्सारख्या मवाल्याला अक्कल असण्याचा फारसा संभव नाही, दंडुकेशाही हीच त्याची अक्कल आणि स्वतःचा बडेजाव हेंच त्याचें धोरण. त्याने देशकल्याणाच्या नुसत्या गप्पा माराव्या. म्युसोलिनीमधे

देशकल्याणाची इच्छा जास्त दिसते, पण तोहि प्रामाणिक मनुष्य नाही आणि त्यानेहि दडपशाही केलेली आहे असें आम्हींच म्हटलें आहे, परंतु दोहोंची तुलना केल्यास म्युसोलिनीचा दर्जा श्रेष्ठ आहे हें कबूल करावें लागेल. राष्ट्राचें हित कशाने होईल हें मवाल्यांपेक्षा सुशिक्षितांना कळण्याचा संभव अधिक असतो आणि सुशिक्षित लोक राजकारणांत यशस्वी झाल्याचीं उदाहरणें थोडीं नाहीत. शिवाजीला लिहितां वाचता येत नव्हतें हें आमचे मतें खोटें आहे आणि याच्या समर्थनार्थ इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'राधामाधवविलासचंपू' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत भरपूर पुरावा दिलेला आहे. ही गोष्ट अनुमानानेंच ठरवायची असल्यामुळे तो सुशिक्षित होता हेंच अनुमान साधार दिसतें. हें बाजूला ठेवलें तरीहि त्याचे पदरीं अनेक सुशिक्षित लोक होते आणि तो त्यांचा सल्ला घेत असे हें नाकबूल करतां येणार नाही. याउलट हिटलर्‌ने जर्मनींतील अनेक विद्वान लोकांना, ते ज्यू आहेत या सबबीवर, देशत्याग करायला लावलें आणि त्यांत आइन्‌ष्टाइन्‌सारखे जगद्वंद्य शास्त्रज्ञ होते. त्याने कोणत्याहि प्रकारचें देशकल्याण केलेलें नाही आणि जेथे झोटिंगशाही नाही त्या देशांचें कोणतेंहि अकल्याण झालेलें नाही. हल्लीचें युद्ध शास्त्रीय ज्ञानावर अवलंबतें हें त्या मवा-ल्याला कळतें तर त्याने शास्त्रज्ञांस बाहेर घालवलें नसतें. राजसत्ता हातीं अस-ल्यास सामाजिक सुधारणा चुटकीसरशा करतां येतात हें आपलें म्हणणें सपशेल खोट आहे. कारण स्वतंत्र देशांत देखील त्या चुटकीसरशा होत नाहीत. आयर्लंद् स्वतंत्र झाल्यावर तें या दृष्टीने अधिकच मागसलें हें सर्वांस माहीत आहे, आणि हिंदुस्थानांतहि तसेंच होण्याचा चांगलाच संभव आहे. तथापि स्वातंत्र्य नसावें असें आमचें म्हणणें नाही आणि राजकारण जोराने करणारांस आम्ही मुळीच दोष देत नाही. परंतु राजकारणी लोकांत मात्र इतकी उदार बुद्धि नाही आणि समाजसुधारणेचा प्रयत्न करणारांना ते नांवें ठेवतात. शिवाय लोकांत बडेजाव होण्याचा मार्ग राजकारण हाच असल्यामुळे तें करणारांचा कधीच तुटवडा पडणार नाही. त्यांना तुरुंगांत जावें लागलें तरी समाजाचा पाठिंबा असल्यामुळे पुष्कळांना त्याचें कांही वाटत नाही. समाजसुधारकांना

मात्र सरकारचा किंवा समाजाचाहि पाठिंबा नसल्यामुळे कोणाचीहि सहानुभूति नसते, तेव्हा हें काम करण्यास सहसा कोणीहि पुढे येत नाही आणि राजकारणी लोकांना लोकप्रियता मिळवायची असल्यामुळे ज्यांना आमची मतें पटतील त्यांनाही तसें म्हणण्याची छाती होत नाही. उलट आम्हाला शिव्या देऊन लोकप्रियता मिळवण्याचा सुलभ मार्ग आमचेमुळे उत्पन्न होतो, याबद्दल राजकारणी लोकांनी आमचे आभार मानले पाहिजेत. स्वातंत्र्य मिळेपर्यंत समाजसुधारणा करू नये म्हणणें हा मनाचा कोतेपणा आहे. २. मंत्रशक्ति हें बुवाबाजीपैकींच थोतांड आहे आणि ज्यांना तर्कशुद्ध विचार करतां येतो त्यांचा त्यावर विश्वास नसतो. सर्पांच्या सर्वच जाती विषारी नसतात आणि येथेच मंत्रवाल्यांचें फावतें, विंचवाचा दंशही कमीअधिक तीव्र असेल इतकेंच नव्हे तर त्याचा परिणाम देखील व्यक्तींवर अवलंबून असतो. कांही लोकांना विंचू फारसा चढतच नाही आणि मंत्रांवर विश्वास ठेवणारांवर मानसिक परिणामहि होईल. असेंहि एकदा घडलें आहे की एका मनुष्याला कांटा बोंचला आणि त्याच वेळीं साप जवळून पाहिल्यामुळे त्याला सर्पदंशाचीं चिन्हें होऊं लागलीं व नंतर कांटा काढून त्याला दाखवला तेव्हा सर्व चिन्हें नाहींशीं झालीं. पुण्याचे श्री. रा. ज. गोखले यांनी मंत्राने सर्पदंश बरा करणारास रु. ५०० चें बक्षिस जाहीर केलेलें असूनहि आपलें सामर्थ्य दाखवण्यास कोणीहि पुढे आलेला नाही. मंत्रबल ईश्वराइतकेंच काल्पनिक आहे. सं.

२

आपलें ' आधुनिक कामशास्त्र ' हें पुस्तक मीं नुकतेंच वाचलें. समागमाचीं निरनिराळी आसनें त्यांत आपण वर्णन केलेलीं आहेत व स्त्रीपुरुषांचे जननेंद्रियांचीं अंगेंहि दाखवलीं आहेत. परंतु त्यांत मला कांही गोष्टींचा खुलासा स्पष्ट दिसून आला नाहीं, तो कळवण्याची कृपा करावी. समागमाचे वेळीं पुरुषाचें इंद्रिय स्त्रीच्या कोणत्या भागांत जावें याबद्दल मला पूर्वी शंका नव्हती व मी × × द्वारांतच समागम करीत असें, परंतु आपलें पुस्तक वाचून शंका उत्पन्न झाली आहे आणि माझे पद्धतींत कांही दोष असेल असें वाटतें. तरी यापैकी कोणती

पद्धत योग्य तें कळवणें. लग्नाला सात वर्षें झालीं, परंतु अजून गर्भधारणा होत नाही. स्त्रीला रजोदोष होता, परंतु तो आता बराच कमी झाला आहे. तरी माझ्या शंकेचें समाधान शक्य तितक्या लवकर कराल अशी आशा आहे. आपला × × ×, वकील, × ×, सी. पी.

**उ.** आपली पद्धत सर्वथैव चुकीची आहे, त्याबद्दल आमचें पुस्तक वाचून आपली खात्री व्हायला पाहिजे होती, त्याऐवजी केवळ शंकाच आली हें आश्चर्य आहे. अज्ञानाने केलेली गोष्ट आपली चूक म्हणतां येणार नाही, तथापि आता समजल्यावर तरी ती सुधारून घ्यावी. आपण उपयोगलेल्या मार्गानें गर्भधारणा होणें शक्य नाही व सात वर्षांत ती झाली नाही यांत नवल नाही. अनैसर्गिक मार्गांनी कांही इजा होण्याचा मात्र संभव असतो. **सं.**

## ३.

खालील जुन्या ग्रंथांतील माहिती आधुनिक शास्त्रीय माहितीच्या कसोटीला कशी काय टिकते याचा खुलासा व्हावा. 'स्त्रीगुह्येंद्रियांतील कंडूचा उपशम दीर्घकाल केल्याने स्त्रियांच्या अंतःकरणांत अनुराग उत्पन्न होतो. अल्पकाल विराग उत्पन्न करतो.' ( वात्स्यानन-कामसूत्रांतील 'बाभ्रव्य' महर्षींचें मत ). 'रक्तज कृमींपासून उत्पन्न होणारी कंडू जो पुरुष चंडवेगी म्हणजे ज्याच्या इंद्रियाचा वेग शक्तिमान आहे, तसेंच चिरसंभवा विसृष्टि म्हणजे ज्याचें वीर्यस्खलन फार वेळाने होतें, अशाकडून उत्तम प्रकारें शमविली असतां स्त्रियांचें पूर्ण समाधान होतें. त्यामुळे त्या स्त्रीचें त्या पुरुषावर प्रेमहि बसल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.' ( कल्याणमल्लाचें अनंगरंग-रतिशास्त्र ) अशींच मतें 'रतिरहस्य' व 'नागरसर्वस्व' यांतही आहेत. या जुन्या संस्कृत ग्रंथांचीं मतें आधुनिक शास्त्रदृष्ट्या टाकाऊ आहेत काय? असल्यास 'स्त्रियांचें समाधान' हें कोडें आधुनिक शास्त्रकार कसें सोडवतात याचा खुलासा व्हावा. वरील जुनीं मतें टाकाऊ नसल्यास 'जुनें तेवढें टाकाऊ' असल्या घातुक प्रवृत्तीने आपण आपल्या ग्रंथसंपत्तीचें नुकसान करीत नाही काय? दुष्यंत-शकुंतला यांच्या पहिल्याच

भेटींत शकुंतलेचें समाधान पूर्ण झालेलें होतें, म्हणून ती पुष्कळ वर्षांनीसुद्धा दुष्यन्ताकडे जाण्याला उत्सुक झालेली होती. या गोष्टीला वरील जुन्या ग्रंथांतील मतें पोषक होत नाही काय? जर तसें नसतें तर शकुंतलेने घटस्फोटाची मागणी केली असती. अलीकडील स्त्रिया घटस्फोटाची मागणी जोरजोराने करतात त्याला कारण विराग हें असूं शकेल काय? आपला नम्र एक वाचक.

उ॰ या जुन्या ग्रंथांतील स्त्रियांच्या समाधानाची उपपत्ति साफ चुकलेली आहे, परंतु पुढे जो निष्कर्ष काढला आहे त्यांत बरेंच तथ्य आहे. योग्य उपपत्ति लावतां न आल्यामुळे हे रक्तज कृमि लेखकांच्या मेंदूंतच उत्पन्न झालेले आहेत. जुन्या ग्रंथकारांना योग्य उपपत्ति लावतां येऊं नये हें खरोखरच आश्चर्य आहे. अथवा असेंहि म्हणतां येईल की प्रत्यक्षाची कसोटी लावून न पहातां अंतर्मुख होऊन केवळ चिंतनाने सर्व ज्ञान डोक्यांतून निघूं शकतें ही जी जुन्या लेखकांची खुळी समजूत सर्वच क्षेत्रांत दिसून येते, तिचेंच हें एक उदाहरण आहे. वास्तविक चिंतनाने दखील ही उपपत्ती लावतां येण्यासारखी होती. त्यांत इतकेंच समजायला पाहिजे होतें की या बाबतींत स्त्रियांत व पुरुषांत फारसा फरक नसतो. तो फरक असावा असें वाटण्याचें एक सबळ कारण आहे हें मात्र खरें. तें हें की पुरुषांचें समाधान सामान्यतः रेतस्खलनाबरोबर होतें आणि यावरून तें रेतस्खलनामुळेच होतें असें या लेखकांस वाटलें, परंतु चिकित्सक विचारवंतांस तसें वाटतां नये, कारण असेंहि घडतें की रेतस्खलनाशिवाय देखील कधीकधी पुरुषाचें समाधान होतें. उदाहरणार्थ थोड्या अंतराने अनेक वेळां समागम झाल्यास शेवटीं असें होतें. यावरून पुरुषाचें समाधान रेतस्खलनावर अवलंबत नाही. या बाबतींतील चुकीच्या समजुतीमुळेच स्त्रीचें समाधान हें कोडें होऊन बसलें, एरवी त्यांत कोडें नाहीं. मज्जातंतूंच्या उद्दीपनाची जेव्हा परमावधि होते, त्या क्षणीं पुरुषास समाधान होतें व स्त्रियांसहि बरोबर तसेंच होतें, त्याला रक्तजन्य कृमींची जरूर नसते. अर्थात् या बाबतींत स्त्रियांत व पुरुषांत थोडाबहुत फरक असतोच आणि तो हा की स्त्रीचें उद्दीपन होण्यास सामान्यतः जास्त वेळ लागतो आणि पुरुषाचें उद्दीपन जसें परमावधीला पोंचल्यावर कड्यावरून खाली लोटून

दिल्यासारखें एकदम खलास होतें, तसें स्त्रियांचें न होतां तें अधिक सावकाश कमी होत जातें. परंतु दोघांचें उद्दीपन एकाच जातीचें असतें आणि दोघांसहि त्याच्या परमावधीपासूनच सुख होतें. या ढोबळ चुकीचें कारण हेंच की स्त्रियांस काय वाटतें हें स्त्रियांकडून समजून घेण्याऐवजी तें डोक्यांतून काढलें आणि त्याकरता कृमि उत्पन्न केले. 'जुनें तें टाकाऊ' अशी प्रवृत्ति कोणाची असेल ती असो, आमची कधीहि नव्हती आणि याचा पुरावा आमच्या 'आधुनिक कामशास्त्र' पुस्तकाच्या प्रस्तावनेंत सांपडेल. परंतु 'जुनें तें सोनें' हें मात्र आम्हास कबूल नाही. सोन्याऐवजी त्यांत बऱ्याच वेळां बुरशी निघण्याचा संभव असतो. जें अनुभवाच्या कसोटीला उतरेल तें खरें, मग तें जुनें असो की नवें. लैंगिक असमाधानानें विराग उत्पन्न होईल आणि घटस्फोटाला पुष्कळ वेळां हें कारण असतें खरें, परंतु लैंगिक समाधानाशिवाय देखील अनुराग उत्पन्न होणें शक्य आहे आणि टिकणेंहि शक्य आहे. अर्थात् टिकण्यास समाधानानें मदत होईल. शकुंतलेला घटस्फोट मागण्याची जरूरी कोठें होती? दुष्यंत तर लग्नच कबूल करीत नव्हता. थोडाबहुत त्रास झाला तरीहि राणी होण्याची संधि स्त्रिया सहसा जाऊं देणार नाहीत, मग घटस्फोटाची गोष्टच कशाला? सुधारक म्हणून मिरवणाऱ्या स्त्रिया राणी होण्याकरता मोठें कुंकूं लावून पडद्यांत रहाण्यास देखील तयार होतात! चैनीची किंमत पुष्कळ स्त्रियांना लैंगिक समाधानापेक्षाहि जास्त वाटते. **सं.**

---

**मतप्रचाराच्या दृष्टीनें कोणाही वर्गणीदारास मासिकाच्या प्रती इष्टमित्रांस फुकट वांटण्याची इच्छा असल्यास त्यांनी तसें कळवावें. प्रत्येकी १० प्रती आमचे खर्चानें पाठवूं. कोणत्या प्रती पाठवणें हें आमच्या मर्जीवर राहील. —संपादक.**

---

# शारदेचें पत्र

सर्वज्ञत्वाचा मक्ता फक्त संपादकांनीच घेतलेला आहे असें मी आजपर्यं समजत होतें, पण खांडेकरांच्या मडगांवच्या अध्यक्षीय भाषणावरून वाटतें क कादंबरीकारहि स्वतःला सर्वज्ञ समजतात. क्यूप्रिन् यांनी वेश्यावृत्तिवर एक उत्त कादंबरी लिहिली एवढ्यावरून वेश्यावृत्तीवरच नव्हे तर विवाह, ब्रह्मचर्य वगैरे सर्व विषयांवर त्यांचे विचार आणि मतें ग्राह्य समजलीं पाहिजेत असें खांडेकरां मत दिसतें. आणि विवाह अगदी लवकर ( म्हणजे २५ व्या वर्षी ! ) कराव आणि तेथपर्यंत ब्रह्मचर्य कसें पाळावें याविषयी ते क्यूप्रिन्‌चा एक उतार देतात. एखाद्या कादंबरीकाराने एखाद्या भव्य राजवाड्याचें उत्कृष्ट वर्णन दि की राजवाडा कसा बांधावा यासंबंधी स्थापत्यशास्त्रांतली माहिती त्याला अस लीच पाहिजे असें खांडेकर म्हणणार ! या पद्धतीने वैद्यक, रसायन, वगैरे ज्य ज्या शास्त्रासंबंधी कादंबरी लिहिणें शक्य आहे त्या शास्त्रांत, म्हणजे सर्व शास्त्रांत म्हणेनास, तज्ज्ञ म्हणजे कादंबरीकार असेंच समजावें लागेल. वस्तुत अशा कादंबऱ्यांत निदान ढोबळ चुका तरी होऊं नयेत म्हणून असे लेखक त्य त्या विषयांतील तज्ज्ञांचा सल्ला घेत असतात आणि घेणेंच योग्य आहे. प प्रत्येक मनुष्य समाजांतच रहात असल्यामुळे वेश्यावृत्तीसारख्या सामाजिक बा प्रत्येकाला समजल्याच पाहिजेत अशी क्यूप्रिनची व खांडेकरांची कल्पना दिसते बिनचूक अवलोकन आणि तर्कशुद्ध विचार हीं ज्यांना साधतील त्यांना शास्त्रीय विचार करतां येईल. हें साधन क्यूप्रिनजवळ नाही. कारण वेश्यांचें नि गिऱ्हाईक विवाहित लोकांतून येतें, तेव्हा विवाहपूर्व ब्रह्मचर्य पाळून भागत नाही आणि कामवासना कमी करणें असेल तर प्रकृति चांगली ठेवण्याचे उपाय सांगू काम होणार नाही, प्रकृति बिघडवण्याचे उपाय सांगितले पाहिजेत, हें त्या कळलें नाही. आणि ब्रह्मचर्याचें खरोखरच त्यांना इतकें महत्त्व वाटत असेल त त्याकरता प्रकृति बिघडली म्हणून काय झालें ! परंपरेच्या चाकोरींतून बाहे

घडण्याची ताकत क्यूप्रिन्मधेहि नाही आणि खांडेकरांतही नाही इतकच यावरून दिसतें. यांत मोठेंसें नवल नाही, कारण खरोखर स्वतंत्र विचार करणारे पुष्कळ लोक लैंगिक बाबींत मात्र स्वतंत्र विचार करायला भितात आणि एवढ्याच बाबतींत परंपरेचे गुलाम होतात.

याचें आणखी एक उदाहरण म्हणजे प्रो पंडितांच्या ' सुधारक ' नाटकावर दोन एंजिनिअरांनी ज्ञानप्रकाशांत केलेली टीका. या टीकेंत बरेंच तथ्य आहे आणि वेश्यांशीं लग्न करायाला लोक तयार झाले म्हणजे वेश्या भराभर लग्नें करतील आणि वेश्यावृत्ति नाहीशी होईल असें पंडितांचें मत असल्यास तें खरोखर हास्यास्पद आहे. पण त्यांची एकंदर विचारसरणी मात्र बरोबर नाही. ते एका जर्मन समाजशास्त्रज्ञाचें मत देतात की भांडवलशाही समाजांत वेश्याव्यवसाय हा एक समाजाचा आधारस्तंभ होऊन बसतो. पण या आधारस्तंभाची जरूर कां लागते हें सांगायला ते विसरतात. वेश्यावृत्तिप्रमाणेच विवाहसंस्थाहि भांडवलशाहीचाच एक घटक आहे, आणि विवाहसंस्थेच्या हल्लीच्या स्वरूपामुळेच या आधारस्तंभाची जरूर लागते. हें त्यांच्या मनावर न बिंबल्यामुळें बरट्रँड् रसेल् यांनी सुचवलेला उपाय त्यांना समजत नाही. भांडवलाच्या विषम वांटणीमुळे कांही स्त्रियांना शरीरविक्रय करावा लागतो आणि कांही पुरुषांजळ त्यांना देण्यास पैसे असतात हें खरें, परंतु विवाहबंधन हल्लीपेक्षा सैल केल्यास म्हणजे रसेल् यांच्या म्हणण्याप्रमाणे विवाह केवळ संततिसंगोपनापुरता करार समजून पतिपत्नींनी एकमेकांस व्यभिचाराचें पूर्ण स्वातंत्र्य दिल्यास ( हल्लीच्या कायद्याने पत्नीला व्यभिचाराबद्दल शिक्षा नसते आणि पतीच्या संमतीने पत्नीशी समागम केल्यास तो पुरुषाचाही गुन्हा होत नाही. तेंव्हा रसेल् यांचा उपाय हल्लीच्या कायद्याविरुद्ध नाही ) वेश्यांना मागणी राहणार नाही, कारण जें फुकट मिळतें तें विकत कोण घेईल? हल्ली रशिआमधे समागमावर कोणताही सामाजिक निर्बंध नाही, हें वेश्यावृत्ति नाहीशी होण्याचें मुख्य कारण आहे, कारण सर्वांची मिळकत सारखी असावी हें तत्त्व कधीच रद्द झालेलें आहे आणि यामुळे पैशाच्या वांटणींत थोडीबहुत विषमता असतेच. रसेल्च्या उपायाने हा प्रश्न बरोबर सुटतो आणि

त्याला भांडवलशाही नडत नाही. परंतु आर्थिक समतावाल्यांचा असाच अट्टाहास असतो की कशाचेंहि खापर भांडवलशाहीवरच फोडायचें ! एरवी रसेलचें म्हणणें सामान्य अकलेच्या माणसांनाहि कळेल. या टीकाकारांनी समष्टिवादाचें एक मोठें अवडंबर माजवलें आहे, जणूं काय समाजाचें नुकसान करून व्यक्तींचा फायदा करावा असेंच स्वातंत्र्यवादी प्रतिपादन करीत असतात ! आम्हालाच तेवढें समाजाचें हित कळतें आणि स्वातंत्र्यवाद्यांना कळत नाही, हें निव्वळ त्यांचें ढोंग आहे. परंतु पारंपरिक नीति म्हणजेच समाजहित हें मात्र स्वातंत्र्यवादी कबूल करणार नाहीत. 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीची नायिका वेश्येची मुलगी आहे व नायक तिच्या आणि स्वतःच्या सुखासाठी सामाजिक नीतिकल्पना झुगारून देतो, असें हें म्हणतात. प्रश्न इतकाच आहे की चालू नीतिकल्पनांमुळे समाजाचें खरोखर हित होतें काय, आणि नसेल तर केवळ समाजाच्या कल्पना म्हणून तसें वागायचें की काय ? या हास्यास्पद टीकेचें कारण इतकेंच की भांडवलशाही-विरुद्ध ओरड करणारे हे टीकाकार या बाबतींत तरी स्वतंत्र विचार करण्यास असमर्थ आहेत. सामाजिक नीतीविरुद्ध जर जायचें नाही तर भांडवलशाही-विरुद्ध तरी कां जायचें ? नीतिकल्पना जुनाट म्हणून पूज्य असल्या तर भांडवलशाही देखील जुनाटच आहे ! ती कां पूज्य नाही ? प्रचलित नीति त्याज्य वाटल्यामुळेच तीविरुद्ध नवमतवादी बंड पुकारतात आणि तें पुकारण्याचा त्यांना पूर्ण हक्क पोंचतो. या टीकाकारांना स्वातंत्र्यवादच कळलेला नाही आणि म्हणूनच ते त्याला व्यक्तित्ववाद अशी शिवी देतात. स्वातंत्र्यवाद्यांचें म्हणणें असें आहे की जेथे समाजहिताचा प्रश्न उद्भवत नाही तेथे व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावें, केवळ समष्टिवाद हा शब्द पुढे करून समाजाने व्यक्तीला दडपून टाकण्याचा प्रयत्न करूं नये. संततीचा व गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येऊं लागल्यापासून समागमाचा प्रश्न खाजगी झाला आहे, तेव्हा त्या बाबतींत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. मात्र हें स्वातंत्र्य उपभोगतांना अनिष्ट संतति किंवा रोगांचा प्रसार होणार नाही अशी काळजी व्यक्तीने घेतली पाहिजे आणि ती न घेतल्यास शिक्षा करण्याचा हक्क समाजाला आहेच. तेव्हा समाजाने व्यक्तींना

निष्कारण दडपून टाकणें हें रास्त म्हणणारे दीडशहाणे कितीहि बरळले तरी त्यांचें कोणी ऐकणारहि नाही.

धार्मिक बावळटपणाचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सनातनी मराठ्यांचें 'पावित्र्यविडंबना'वर व्याख्यान आणि माटे मास्तरांचें, चुकलें, प्रो. माटे यांचें, अध्यक्षीय भाषण. कोल्हटकरांच्या शारीरिक व्यंगासंबंधी असभ्य समाधान व्यक्त करून मग त्याबद्दल गिल्ला होऊं लागल्यावर प्रो. माटे ज्ञानप्रकाशांत आपलें समर्थन करूं पहातात. इतकें लंगडें समर्थन मी आजपर्यंत पाहिलें नव्हतें. कोल्हटकरांना गणपतीनें शिक्षा केली असेंच त्यांना म्हणायचें होतें हें त्यांना कबूल आहे, पण त्यांचें तोंड वांकडें झालें ही ती शिक्षा नसून त्यांना रामनामाचा जप आवडूं लागला ही शिक्षा होय, असें ते आता म्हणतात. तो आवडूं लागला हीही थापच आहे. पण जर तो आवडूं लागून कोल्हटकर करूं लागले, तर ती शिक्षा कशी म्हणतां येईल ? आवडती गोष्ट करणें ही काय शिक्षा आहे ? तोंड वांकडें होणें यालाच शिक्षा म्हणणें शक्य आहे, आणि त्यांना गणपतीच्या नामाचा जप आवडूं लागला असता तर तो कदाचित् शिक्षा म्हणतां आली असती. पण चेष्टा केली गणपतीची आणि नांव आवडूं लागलें रामाचें ! राम गणपतीचा कोण लागतो ? आणि शिक्षा करण्याची जर गणपतीच्या अंगांत शक्ति असेल तर ती सर्वांना सरळ समजेल अशी कां केली नाही आणि माट्यांची अशी विनाकारण धांदल कां केली ? कोल्हटकरांनी केलेलें विडंबन अत्यंत उपयुक्त होतें आणि तें वस्तुतः गणपतीचें विडंबन नव्हतेंच, कारण ज्याला अस्तित्वच नाही त्याचें विडंबन कसें करतां येईल ? तें वास्तवीक गणपतीसारख्या वेड्यावांकड्या देवतांवर विश्वास ठेवणाऱ्या धार्मिक बावळटांचें विडंबन होतें; माट्यांनी आपली नोंद त्या बावळटांत करून घेतलीच आहे आणि यांत मोठेंसें नवल नाही. ते म्हणतात, 'तरुणपणचा माजोरीपणा थोडा ओसरल्या-नंतर भ्रांत उद्गार काढणारे पुष्कळ सुधारक शुद्धीवर येतात व समंजसपणें बोलूं लागतात, आणि कोल्हटकरांचें तसेंच झालें ' याचा वास्तविक अर्थ असा आहे की म्हातारपणीं पुष्कळांची विचारशक्ति कमी होते आणि ईश्वर कदाचित् असला

तर त्याने आपल्यावर सूड घेऊं नये म्हणून ते ( प्रार्थना करण्यांत काय नुकसान आहे, म्हणून ) प्रार्थना वगैरे प्रकार करूं लागतात. विचारशक्ति कमी झाल्याचा हा परिणाम आहे, समंजसपणाचा नव्हे, कारण समंजस मनुष्य असें म्हणेल की कदाचित् ईश्वर असलाच आणि तरीहि आपल्या प्रामाणिक समजुतीमुळे आपण तो नाही असें म्हटलें तर तो आपल्याला प्रामाणिकपणाबद्दल शिक्षा करील काय ? करील तर तो अत्यंत दुष्ट असला पाहिजे. अशा दुष्टाची प्रार्थना करणे म्हणजे हलकटपणा नव्हे काय ? वस्तुतः अर्धवट लोंकांचाच ईश्वरावर विश्वास असतो आणि कांही लोकांच्या बुद्धीचें तेज म्हातारपणीं कमी होतें. अर्थात् माव्यां सारख्या लोकांना तशी कांही भीति नाही. तूं पुण्यांतलीच आहेस तेव्हा माव्यांच्या बुद्धिमत्तेचे मासले तुला माहीत असतीलच, तरीपण मी एक सांगतें, त्यांनी अलीकडे कांही जाडजूड पुस्तकें प्रसिद्ध केल्यामुळे त्यांना आपल्याजवळ ज्ञानाचा गठ्ठा असल्यासारखें वाटतें आहे आणि या कल्पित ज्ञानाचा ते लोकांना फायदा देऊं पहातात. विज्ञानबोधाच्या शेवटच्या भागांत त्यांनी पुढील माहिती दिली आहे. थंडी नाहीशी कां करतां येत नाही ? असा प्रश्न विचारून त्याचें ते उत्तर देतात की थंडी असा मुळीं पदार्थच नाही, उष्णता हा पदार्थ आहे आणि त्याचा अभाव म्हणजेच थंडी. तेव्हा जो पदार्थच नाही तो नाहीसा कसा करतां येईल ? इतकी अगाध बुद्धि म्हातारपणीं तरी कमी कशी होणार, तूंच सांग ! खरें म्हटलें तर कोल्हटकर नास्तिक कधीच नव्हते, तेव्हा ते म्हातारपणीं रामाचें किंवा आणखी कोणाचें नांव घ्यायला लागले तरी त्यांत विशेष काय आहे ? पण हें सनातनी बावळटांना कसें कळणार ? माटे म्हणतात मला तिरस्कार्य करण्याकरता लोक टपून बसलेले आहेत. माव्यांनी स्वतःला इतकें महत्त्व द्यावें हें मी एक वेळ क्षम्य समजेन, पण स्वतःला हास्यास्पद करून घेण्याची शक्ति त्यांचे अंगीं ओतप्रोत भरलेली असतांना इतरांना ती खटपट करण्याचें काय कारण आहे ? यासंबंधी चर्चेंत वामनराव जोशी म्हणाले की केळकरांचे मतें ज्या विधवेला राहवत नसेल, तिनेच पुनर्विवाह करावा. राहवत नाही असें ठरवायला तिचें वांकडें पाऊल पडलें पाहिजे,

किंवा ती मेली पाहिजे ! केळकर आहेत झालें ! यांना पुढारी म्हणायचें !

गोव्याच्या 'प्रभात' मासिकाच्या मेच्या अंकांत सुरवातीलाच माधव ज्युलियन यांची 'प्रियेस' नांवाची एक कविता छापली आहे. कवितेला १४ च ओळी, यमकें वांकडीं तिकडीं केलेलीं, वगैरे सगळीं आधुनिक सोंगें त्यांत आहेत. तीं मला फारशीं पसंत नाहीत, पण तें असो. परंतु अशा पंडित कवीने लिहिलेल्या ओळींतलीं अक्षरें वृत्ताला तर जुळावीं की नाही ? त्यांनी हें 'सुनीत' का कायसें म्हणतात तें हरिणी वृत्तांत लिहिलें आहे, पण मधेच एका ओळींत त्यांनी खुशाल एक दोनमात्री अक्षर जास्त दडपलें आहे. तूंच पहा. 'कुणिहि न बघे प्रेम स्वांतीं विशुद्ध किती बाणलें'. हें वाचून त्यांची प्रिया काय म्हणेल कोणाला माहीत ! पण मला तर अशी ओळ वाचली कीं कसेंसेंच होतें.

तुझी **शारदा**

---

# मांसाहार व शाकाहार

लेऑं मनिए ( प्रेस् मेडिकॅल् )

एकाच जेवणाचे वेळीं मांस आणि शाक हीं दोन्हीहि खाण्याची पद्धत सार्वत्रिक आहे. तें आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचे दृष्टीने योग्य आहे काय, की मांस व शाक हीं वेगवेगळीं खाणें योग्य होईल, याचा येथे विचार करणें आहे.

शाकाहारांत शरीरास उपयोगी पदार्थ म्हणजे बहुतांशीं पिठूळ पदार्थ असतो आणि लाळेंतील 'टायॅलीन्' नांवाच्या आंबवणाने त्याचें तोंडांत थोडें-बहुत रूपांतर होऊन नंतर तें पोटांत पुरें होतें. परंतु पोटांतील आम्ल रसामुळे या क्रियेस विरोध होतो आणि तटस्थ ( म्हणजे आम्लहि नाही व अल्कहि नाही अशा ) परिस्थितींत ही क्रिया उत्तम चालते असें अनेक शास्त्रज्ञांनी प्रयोगांवरून ठरवलें आहे. आम्ल कांही मर्यादेपलीकडे गेल्यास टायॅलीन्चा नाश होतो.

उलटपक्षीं मांस व मासे यांत मुख्यतः ' आल्बुमेन् ' ( अंड्याचे आंती पांढरा भाग किंवा तत्सम पदार्थ ) असतें. याचें पचन पोटांतील आम्लाने पेप्सीनने होतें, म्हणजे त्याला आम्ल परिस्थिति लागते. असें असतां मांस शाक यांचें एकाच वेळीं चांगलें पचन होणें शक्य नाही हें उघड होतें.

यासंबंधीं कांहीं प्रयोग केलेले आहेत ते असे. एका मनुष्याला रिकाम्य पोटीं उकडलेले बटाटे खाऊं घातले आणि अर्ध्या तासाने ते ( ओकारी करून ) बाहेर काढले. तेव्हा त्यापैकी शेंकडा ३२ इतक्या भागाचें रूपांतर झालेले आढळलें. दुसऱ्या दिवशीं त्याच मनुष्याला प्रथम थोडें शिजवलेलें मांस खाऊं घातलें आणि नंतर पूर्वीप्रमाणेच बटाटे खाऊं घालून अर्ध्या तासानें बाहेर काढले, तेव्हा फक्त शेंकडा साडेबारा इतक्या भागाचें रूपांतर झालेलें आढळलें. याचे कारण असें की बटाट्यांमुळे पोटांत आम्लरस फारच थोडा उत्पन्न होतो किंवा मुळीच होत नाही, यामुळे बटाटे चांगले पचतात आणि मांसामुळे पोटांत आम्लरस पुष्कळ येतो, त्यामुळे बटाट्याचें पचन चांगलें होत नाही.

बटाट्यांबरोबर मांस खाल्ल्याचा आणखीहि एक वाईट परिणाम होतो, तो हा की पचनास वेळ लागल्यामुळे अन्न पोटांतून बाहेर म्हणजे आंतड्यांत जाण्यासहि जास्त वेळ लागतो, आणि आम्लरस पोटांत जास्त वेळ राहिल्यास त्यापासून त्रास होतो.

या सर्वांचा विचार करतां निदान ज्यांची पचनशक्ति विशेष चांगली नसेल त्यांनी पुढीलप्रमाणे व्यवस्था करावी. सकाळच्या न्याहारीला सालींसकट फळें, मुरंबे आणि हिरव्या ( न शिजवलेल्या ) भाज्या हे पदार्थ खावे. यांत न पचण्यासारखा भाग बराच असल्यामुळे त्याने पोट साफ राखण्यास मदत होते. हे पदार्थ वेगळेच खावे, कारण हे इतर अन्नाबरोबर खाल्ल्यास तें अन्न लवकर पोटांतून बाहेर पडत नाही आणि त्यामुळे त्रास होतो.

दुपारच्या जेवणाचे वेळीं मांस व मासे खावे व हें नुसतेंच खाणें कोणास पसंत पडणार नाहीं, तेव्हा त्याबरोबर कांहीं पालेभाज्या, किंवा गाजरांच्या

जातीच्या भाज्या चालतील, कारण यांत पिठूळ पदार्थ शेंकडा फक्त ८ ते १२ असतो; किंवा उकडलेले बटाटेहि चालतील, कारण त्यांत शेंकडा २० हें प्रमाण असतें; पण पावासारखे पिठाचे पदार्थ मात्र खाऊं नये, कारण त्यांत पिठूळ पदार्थ शेंकडा ६० असतो.

सायंकाळीं पिठूळ पदार्थांचें जेवण करावें. पाव ( शेंकडा ६० ), भात ( शेंकडा ७५ ), कडधान्य ( शेंकडा ५० ). अशा रीतीनें तीन जेवणें तीन प्रकारचीं केलीं म्हणजे हे सर्व प्रकार नीट पचतात. ते मिसळल्यास नीट पचत नाहीत.

कोणी म्हणतील, आमची पचनशक्ति चांगली आहे, आम्हाला कांहीहि पचतें ! असे लोक कदाचित् उपदेश ऐकणार नाहोत, पण अशा लोकांचीहि पचनशक्ति कधींकधी बिघडते आणि ती बिघडल्यावर उपचार करण्यापेक्षा प्रथमच काळजी घेणें अधिक समंजसपणाचें होईल. तेव्हा अशांनीहि वरील नियम पाळल्यास त्यांचें नुकसान होणार नाही.

( येथें हें सांगणें जरूर आहे की अमेरिकेंतील प्रसिद्ध डॉ. रॉबिनसन् यांचें मत याशीं जुळत नाही. ते म्हणतात अन्नांतील पिठूळ भागाचें पचन नेहमीच तोंडांत अर्धवट होतें व बाकीचें पचन तो भाग पोटांतून आंतड्यांत गेल्यावर होतें, कारण पोटांत आम्लरस आल्यामुळे तेथे त्याचें पचन तहकूब राहतें. तें तसें तहकूब राहिलें तरी हरकत नाही व एकंदरींत मिश्र आहारच चांगला असें त्यांचें म्हणणें आहे. आम्ही त्यांतून असा निष्कर्ष काढतों ज्याला जें पचतें असें अनुभवाने माहीत आहे त्याने तें खावें, कारण या बाबतींत व्यक्तीव्यक्तींत अतिशय फरक सांपडतो. )

---


## व्यायाम–१६

३८. जमिनीवर सरळ उताणे निजा. गुडघे ताठ करा, आणि हात

मानेखाली ठेवा. १. पाय जमिनीपासून एक इंच वर उचला. २. गुडघे ताठ ठेवून पाय उचलून उभे करा ( हें कठिण असतें, कारण लक्ष न ठेवल्यास गुडघे वांकतात. ते प्रथमपासून शेवटपर्यंत ताठ राहिले पाहिजेत ) ३. डावा पाय शक्य तितका डावीकडे आणि उजवा उजवीकडे न्या. ४. नंतर पाय पुनः परत आणून जोडा. ५. नंतर जमिनीपासून एका इंचावर आणा, आणि ६. नंतर टेका. असें ५–६ वेळां करा.

नंतर पाय सरळ वर नेण्याऐवजी वर्तुळाकार न्या. म्हणजे, १. प्रथम पाय जमिनीपासून एक इंच उचला, २. नंतर डावा पाय डाव्या बाजूला व उजवा उजव्या बाजूला शक्य तितका नेऊन नंतर वर नेऊन जोडा. ( दोन्ही पाय मिळून हवेंत एक आडवें लंबवर्तुळ निघालें पाहिजे ) ३. नंतर पाय त्याच मार्गानें परत नेऊन जमिनीपासून एका इंचावर आणा, ४. नंतर टेका. असें ५–६ वेळां करा.

३९. ताठ उभे रहा. हात आडवे वर नेऊन मानेमागे अशा रीतीने न्या की दोन हातांचीं बोटें एकमेकांस लागलीं पाहिजेत ( आकृति ३३ ), हात मणगटांत किंवा बोटांत वांकतां नये, कोपरापासून बोटांपर्यंत हात सरळ राहिला पाहिजे, तळहात पुढच्या बाजूकडे झाले पाहिजेत आणि खांद्यांच्या मागचीं हाडें एकमेकांच्या शक्य तितकीं जवळ आलीं पाहिजेत. याकरता कोपरें शक्य तितकीं मागे नेलीं पाहिजेत, परंतु डोकें नेहमीप्रमाणे मागे खेचलेलें असेल, तें बोटांच्या दाबानें पुढे जातां नये. नंतर हात परत खाली आणा. असें ३–४ वेळां करा.



( आकृति ३३ )

**शहाण्यांचा मूर्खपणा.** ' मनुष्याला आत्मविश्वास पाहिजे. परमेश्वरावरील विश्वासाने आत्मविश्वास वाढतो, ' ' जादूने पेढे आणतां येतात या गोष्टीवर माझा विश्वास आहे, मात्र ज्या दुकानदाराकडून जादूने पेढे आणले त्याचे पैसे त्याने चुकते केले काय याची चौकशी करावी ' ( प्रि. गं. नी. गोखले यांचें पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेंतील व्याख्यान ). या विद्वानांनी बुवाबाजीवरील व्याख्यानांत सांगितलें की लोक बुवांकडे जातात ते फुकटांत कांहीतरी मिळविण्याकरिता किंवा आंवळा देऊन कोहळा काढण्याकरता जातात. पण हे गृहस्थ स्वतः ईश्वरवादी असल्यामुळे त्यांना हें सूत्र कळलें नाहीं की ईश्वर हाहीं एक काल्पनिक बुवाच आहे आणि त्याच्यावरहि लोक तेवढ्याकरताच विसंबतात. आत्मविश्वास सोडून मनुष्य जर कशाने नेभळट होत असेल तर तो ईश्वरावर विसंबल्याने. परमेश्वरावरील विश्वासाने आत्मविश्वास वाढत नाही, नाहीसा होतो. आणि जादूने जर पेढे आणतां येतात तर ते कोणाच्या दुकानावरूनच कशाला आणावे लागतात ? ते जादूने उत्पन्नच कां करतां येणार नाहीत ? दोन्ही कल्पना सारख्याच हास्यास्पद आहेत. ईश्वरावरील विश्वासामुळे आत्मविश्वास तर काय, पण सामान्य विचारशक्ति देखील नाहीशी होते याचा प्रत्यक्ष पुरावाच प्रि. गोखल्यांनी आपल्या व्याख्यानांत दिला. आणि हे एक विद्वान् प्रोफेसर आहेत म्हणे ! पॅस्कल् जसा प्रयोगशाळेंत जातांना आपला धर्म बाहेरच्या खुंटीला लावून ठेवीत असे, तसेंच हे प्रोफेसरहि करीत असले तर ठीक, नाहीतर विद्यार्थ्यांपुढे फजितीची वेळ !

नात्सी पक्षांतील पाळीव डाक्तर. हिटलरच्या झोटिंगशाहींत त्याच्या मताविरुद्ध कोणाला कांहींहि प्रसिद्ध करता येत नाही आणि हा नियम वैज्ञानिक सत्याला सुद्धा लागतो. हिटलरला युद्धाच्या दृष्टीने जन्मसंख्या शक्य तितकी वाढायला पाहिजे आहे आणि म्हणून तो संततिनियमनाच्या व तज्ज्ञांनी केलेल्या गर्भपातांच्याहि विरुद्ध आहे. याकरता तो आपल्या पक्षांतील पाळीव डाक्तरांकडून खोटी विधानें असलेले लेख लिहून घेतो. अशाच प्रकारच्या एका ' फेष्ट् ' नांवाच्या डाक्तराने लिहिलें आहे की संततिनियमनाच्या साधनांनी योनिमार्ग,

गर्भाशय, बीजवाहक नलिका वगैरेंना इजा होते, धुपणी होते, कॅन्सर देखी होतो. याचें अर्थातच एकहि उदाहरण दिलेलें नाही आणि हें केवळ जर्म लोकांनी संततिनियमन करूं नये म्हणून त्यांना घाबरवण्याकरता लिहिलेलें आ त्याचप्रमाणे संततिनियमनाचीं साधनें वापरल्यास पुढे व्यंग किंवा वेडसर मु होतात असेंहि त्याने लिहिलें आहे अर्थातच हीं सर्व विधानें खोटीं आहेत आणि तीं केवळ हिटलरच्या हुकुमावरून किंवा त्याची मर्जी संपादण्याकरता केलेल आहेत. त्याचप्रमाणे एका डाक्तराने असेंहि लिहिलें आहे की गर्भपातानंतर शेकड ५० स्त्रियांना वंध्यत्व, मंदकामता आणि गर्भाशयाचे व बीजकोशांचे अनेक रो होतात. अर्थात् कोणी तरी अडाणी मनुष्याने गर्भपात केल्यास परिणाम वाई होतील, पण तज्ज्ञांनी केल्यास बिलकूल भीति नसते आणि वरील विधानें म्हणजे हिटलरचें बनावट सत्य होय ( डॉ. रॉबिनसन् याचे लेखावरून )

---

**संततिनियमनाकरता शस्त्रक्रिया.** ही करतांना बीजवाह नलिका जेथे कापतात त्याच्या पुढे अगोदरच गेलेले कांही रेतजंतु रेताशयां राहतात व ते नाहीसे किंवा निर्जीव होईपर्यंत, म्हणजे कधी कधी दोनती महिनेपर्यंत, गर्भधारणेची भीति शिल्लक राहते असें आम्हीं प्रसिद्ध केलेलें वाच कांच्या लक्षांत असेल. यासंबंधी जर्मनींत अशी सुधारणा झाली आहे की शस्त्रक्रिया करतेवेळींच रेताशय पिचकारीने धुवून काढून या राहिलेल्या रेतजंतूंचा नाश करतात, म्हणजे गर्भधारणेची भीति नाहीशी होते. येथील शस्त्रवैद्यांना हा शोध उपयोगी व्हावा.

---

मवाली राज्य. वैद्यशास्त्रांत अत्यंत महत्त्वाचे व जगन्मान्य झालेले शोध जर्मनींतील अनेक ज्यू डॉक्तरांनी लावलेले आहेत. ते ज्यू म्हणून त्यांना हांकून देऊन हिटलरने आता असें पुकारलें आहे की जगाला उपयोगी झालेले हे सर्व शोध खोटे आहेत. उदाहरणार्थ गर्मीसंबंधी वासेरमानचा शोध हा कुचकामाचा असून तें केवळ ख्रिश्चन लोकांचें रक्त मिळवण्याकरता ज्यू लोकांचें ढोंग होतें, असें तो म्हणतो. खोटें बोलण्याबद्दल बक्षिस असल्यास तें हिटलरलाच द्यावें लागेल.

## निवडक जाहिराती

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई नं. ४.

### प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. **आधुनिक कामशास्त्र** [सचित्र], दुसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.

२. **संततिनियमन** [सचित्र], ६ वी आवृत्ति,
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

३. **गुप्तरोगांपासून बचाव** [सचित्र], २ री. आ.
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

४. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग१ला [पहिलीं तीन वर्षें],२—४—०, ट.ख. ६ आ.
भाग २ रा [वर्षें ४—५—६],२—०—०, ट.ख. ५ आ.
दोन्ही भाग घेणारांस कि. ४—०—०, ट.ख. ८ आ.

**डॉ. के. भा. लेलेकृत**

**बाहेरख्यालीचे दुष्परिणाम**, २ री आ., किं. ५ आ.

**श्री. भास्कर धोंडो कर्वे**, एम्. एड्. कृत,

**मी कसा झालों ?** किं. ८ आ. ट. ख. ४ आ.

**प्रो. धों. के. कर्वे कृत**

**संक्षिप्त आत्मवृत्त**, किं. १२ आ., ट. ख. ५ आ.